● सोमवार, दि. २ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२४ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# उद्धव ठाकरे सोबत असते तर यापेक्षा जास्त बहुमत मिळाले असते - रावसाहेब दानवे

**मुंबई** - शिवसेना जर काँग्रेस राष्ट्रवादी सोबत गेली नसती तर १४ ते १९ पर्यंत सारखाच कारभार झाला असता आणि त्या कारभाराच्या आधारावर याहून अधिक जागा आल्या असत्या. उद्धव ठाकरे सोबत असते तर आज जेवढं बहुमत मिळाले त्यापेक्षा जास्त बहुमत मिळालं असतं. ते सोबत नाही तरी सुद्धा जास्त आल्या, असं वक्तव्य माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांनी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलतांना केले.



रावसाहेब दानवे म्हणाले, निवडणूक समितीचा प्रमुख असल्याने मी आज भेट घेतली. पाच तारखेला भारतीय जनता पार्टीच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी आहे. आधी विधिमंडळ पक्षाची बैठक होईल नेता निवडला जाईल आणि त्यानंतर मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला जाईल. जसं ठरलं तसं सुरू आहे कोणताही वादविवाद आमच्यात नाही. मुख्यमंत्री कोण हा प्रश्न सगळ्यांनाच पडला आहे. मात्र आम चं मुख्यमंत्री कोण हे ठरलं आहे. जोवर वरिष्ठांची सही होत नाही तोवर अधिकृत रित्या प्रकाशित होत नाही, असा आमचा पार्टीचा विषय आहे.

जोवर वरिष्ठांचा शिक्का बसत नाही तोवर मुख्यमंत्रिपदाचे नाव माहित असलं तरी जाहीर होणार नाही. सगळं ठरल्याप्रमाणेच होणार आहे. प्रसंग, वेळ पाहून आम्ही सगळं करत असतो. वेळही ठरवली आहे, तारीखही ठरवली आहे. जो कोणी आमचा नेता निवडला जाईल तो आमचा मुख्यमंत्री असेल. सगळं ठरलं आहे बॉसचा शिक्का झाला की सगळं समजेल, असंही दानवे यांनी स्पष्ट केलं. पुढे बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले, कार्यकर्ते त्यांच्या प्रमाणे अनेक गोष्टी करत असतात त्याला आमची मान्यता नसते. रक्ताने पत्र लिहिण्याने कोणी मुख्यमंत्री होत नाही. एकनाथ शिंदे बिलकुल नाराज नाहीत. केवळ वर्तमानपत्र आणि चॅनलला चाललेली बातमी आहे. ते स्वतःच्या गावी गेले आहेत शंका उपस्थित करण्याचा प्रश्न नाही. त्यांना ताप आलाय आरामाचा सल्ला दिलाय त्याच्यावर देखील शंका उपस्थित केली जाते आहे. संजय राऊत म्हणतात त्यांचा चेहरा पडला पण हे सारेच पडलं तरी आम्ही त्यांच्याबद्दल बोलत नाही. त्यांना रुग्णालयात ॲडमिट करण्याची गरज आहे. जे जे बोलतात ते खोटं ठरलं. त्यांच्या वागण्यामुळे शिवसेना फुटली आता ते उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंमध्ये भांडण लावत आहेत. जे काही झालं ते त्यांच्या मुले झालं आहे. भाजप शिवसेना एकत्र राहिली असती तर यापेक्षा जास्त बहुमत मिळालं असतं. उद्धव ठाकरे यांची वाट भरकटवली. जर उद्धव ठाकरे आदित्य ठाकरे यांच्यामध्ये भांडण झाले तर कारण संजय राऊत असतील, असा टोलाही रावसाहेब दानवे यांनी लगावला.

# जालना ते नांदेड समृद्धी महामार्गाच्या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध

## शासनाच्या कर्मचाऱ्यांना शेतात पाय ठेवू देणार नसल्याचा इशारा



**जालना । प्रतिनिधी** - तालुक्यातील शेवगा शिवारात रविवार (दि १) रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास जालना ते नांदेड समृद्धी महामार्गाच्या भूसंपादनाला जालन्यातील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. मागणी नसतांना हा प्रकल्प शेतकऱ्यांवर लादला जात असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. हा समृद्धी महामार्ग नसून शेतकऱ्यांना बरबाद करणारा प्रकल्प असतांनाही शासन महामार्ग बनविण्याचा प्रयत्न करत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी महागाच्या असतांना त्यांना योग्य म ोबदला दिला जात नाही. बागायत जमीन असतांना ती जम ीन कोरडवाहू म्हणून नोंद करत असल्याचा गंभीर आरोपही शेतकऱ्यांनी लावला आहे. बाजारभावानुसार शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली असून जोपर्यंत मोबदला मिळत नाही तो पर्यंत शासनाच्या कर्मचाऱ्यांना शेतात पाय ठेवू देणार नसल्याचा ईशाराही यावेळी शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीच्या गटनेतेपदीत आव्हाड तर प्रतोदपदी पाटील

**पुणे** - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नवनिर्वाचित आम दारांची आज मुंबईत बैठक संपन्न झाली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा गटनेता म्हणून जितेंद्र आव्हाड यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. तर, दिवंगत नेते आर.आर. पाटील यांचे सुपुत्र व देशातील सर्वात तरुण आमदार असलेल्या रोहित पाटील यांना मुख्य प्रतोदपदी संधी देण्यात आली आहे. त्यामुळे, कमी वयात मोठी जबाबदारी रोहित पाटील यांच्यावर शरद पवारांनी टाकल्याचं पाहायला पान २ वर

# शरीर व मन तंदुरुस्त ठेवायचे असेल तर मैदानावर जा - अंबेकर



**जालना । प्रतिनिधी** - आजच्या काळातील तरुण मैदानावर दिसत नाहीत. प्रत्येक जन मोबाईल मध्ये मग्न असून खेळ सुद्धा मोबाईलवरच खेळले जात आहेत. याचा विपरीत परिणाम तरुणांमध्ये दिसून येत आहे. वयाच्या ३५ ते ४० व्या वर्षी शुगर बीपीसारखे आजार जडत आहेत. वेगवेगळ्या खेळांच्या माध्यमातून तरुण मैदानावर आल्यास त्याच्या व्यक्तिमत्वचा विकास होतो. त्यांच्यात सांघिक भावना वाढते. सम ाजा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या जातीय भावनाही मैदानावर गेल्याने कमी होतात. जालना शहरातील स्टेशन रोडवरील क्रीडा प्रबोधिनी येथे डॉजबॉल असोशिएशन व जिल्हा परिषद निवासी क्रिडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने १४ वी सब जुनियर मुली व मुले यांची राज्यस्तरीय डॉजबॉल अजिंक्यपद क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी स्पर्धेचे उद्घाटक जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर बोलत होते. यावेळी जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष निवृत्ती दिवटे, सचिव हनुमंत लुंगे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर निकम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते सिध्दार्थ कदम, डॉ. प्रकाश अंबेकर, रामनारायण जैस्वाल, कुंदल बागडी, सचिव प्रमोद खरात आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, क्रिडा प्रबोधिनीच्या माध्यमातून घडलेले अनेक खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले. या खेळाडूंनी स्वतः बरोबरच आपल्या आई वडिलांचे व जिल्ह्याचे नाव मोठे केले. आज होत असलेली राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धा जालना शहरात होते ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. तरुण खेळाकडे आकर्षित होण्यासाठी आपल्या शहरातील अनेक दानशूर व उद्योगपती यांनीही मदतीसाठी पुढे येऊन शहरात मैदाने विकसित करून दिली पाहिजेत. दीडशे कोटी लोकसंख्या पान २ वर

युवा आदर्श

## झुकते माप ...

समोरच्या पक्षाला
द्यायचे झुकते माप
योग्य राखू संतुलन
मन ठेवायचे साफ
पक्ष श्रेष्ठी दूरान्वेषी
विचार हो टापोटाप
कानखरे कृतिशील
बोलायची नसे टाप
सन्मान सांभाळता
गिळंकृत तो संताप
पक्षश्रेष्ठी चाणाक्षता
उजळू जाय महताप
सन्मान मित्रपक्षांचा
नको लपवलेले पाप
उदिष्ट शर संधानार्थ
वेळेवरती ओढे चाप
कठीण बनते काम
विस्तारे जेंव्हा व्याप
कार्यकर्ते विम्जीकल
निस्तरे सारे उपद्व्याप
करे सांभाळू पक्षांस
शांत करी मनस्ताप
पक्षात पाडी खिंडार
काही अंतस्थ प्रताप
खुशठेवता मित्रपक्षा
भलतीचं लागते धाप
नुकतीचं नवीन सून
ओलांडूनआली माप

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# शास्त्री विद्यालयाच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी बस सेवेचा शुभारंभ



**परतूर । प्रतिनिधी** - परतूर शहरातील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या पुढाकारातून वलखेड, बामणी, शेरोडा, शेवगा इतर गावातील विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी आगारप्रमुख माधुरी देशमुख यांच्या हस्ते बससेवेचा शुभारंभ कारण्यात आला.यावेळी वाहतूक नियंत्रक साळवे मॅडम,जगदीश बरसाले,मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्यासह गावकरी मंडळी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

येथील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात वलखेड, बामणी, शेरोडा, शेवगा या व इतर गावातील विद्यार्थी मोठया संख्येने शिक्षणासाठी येतात. परंतु या गावांना बससेवा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची अडचण होत होती.विद्यार्थ्यांची शाळेत येण्या-जाण्याची अडचण लक्षात घेत मुख्याध्यापक बिरादार सरांनी आगारप्रमुख श्रीमती माधुरी देशमुख यांची भेट घेत बससेवा सुरु करण्याची विनंती केली. देशम ुख यांनी या मागणीची तातडीने दखल घेत बस सुरु केली. त्यामुळे विद्यार्थी, गावकरी, पान २ वर

# सिल्लोड शिक्षण संस्थेचे जनार्धनराव म्हस्के यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान



**जाफ्राबाद । प्रतिनिधी** - सिल्लोड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. जनार्दनराव म्हस्के उर्फ दादासाहेब यांना दुबई येथे ७ नोव्हेंबर रोजी क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले साहित्य परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे मिलिंद महाविद्यालय व सांगली येथील दीपस्तंभ सांस्कृतिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच जाहीर झालेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार दुबई येथे झालेल्या चौथ्या विश्व आंबेडकरवादी साहित्य संमेलनात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. रावसाहेब कसबे होते तर प्रम ुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस हे होते.

डॉ. एम. के. मकवाना साहित्यिक के. पी. सिंग, प्रा.कृपाशंकर वासनिक, डॉ. वैशाली प्रधान, डॉ. जगन वंजारी, संमेलन आयोजक प्रा. दीपक कुमार खोब्रागडे, डॉ. अंजली ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थाध्यक्ष श्री. जनार्दनराव म्हस्के उर्फ दादासाहेब यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करून पुरस्कार प्रदान करण्यात आला. यापूर्वी त्यांना अनेक सामाजिक संस्थेकडून विविध पुरस्कार मिळालेले आहेत. फुले- शाहू-आंबेडकरी चळवळीम ध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ यांनी घेऊन त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पान २ वर

# हिंदू धर्म टिकला तरच देश टिकेल - हभप प्रकाश महाराज



**जालना । प्रतिनिधी** - पक्षा पक्षांचे राजकारण करतांना हिंदू धम र्ला विसरू नका हिंदूधर्म टिकला पाहिजे हिंदू धर्म टिकला तरच देश टिकेल असे प्रतिपादन भागवताचार्य हभप प्रकाश महाराज साठे यांनी कीर्तनातून बोलतांना केले

बदनापूर तालुक्यातील सायगाव डोंगरगाव येथील श्रीक्षेत्र पावनधाम आश्रम येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात बोलत होते पुढे बोलतांना महाराज म्हणाले . मन एकाग्र झाले तरच परमार्थ होतो, मनाने मनावर घेतले तर कल्याण आणि वाईट हि होते, माणसाची गतीही मनाच्या हातात असते, मनामुळे शहाणी माणसेही नाडली जातात. मन ताब्यात असेल तर परमार्थ सफल होतो मनाला बोध होत नाही तोपर्यंत परमार्थ होत नाही मनाची संगत चुकली की माणूस चुकतो चांगल्या गोष्टी देहाला आवडत नाहीत मन चांगले आहे परंतु इंद्रियाच्या आदिन आहे , ज्याने मनाला शिकविले त्याने जगाला शिकविले, संसार हा निरर्थक आहे संसार हा माणसाला एका जागी राहू देत नाही सार भगवंत आहे तर असार संसार आहे. काही पान २ वर

# संपादकीय पान

## सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी ऑनलाईन सुविधा

**जालना -** परिवहन विभागाकडून ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरणा करुन पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्याची ऑनलाईन सुविधा दि.२५ नोव्हेंबर २०२४ पासून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना येथे कार्यान्वित करण्यात आली आहे. पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्याची सुविधा फेसलेस असून अर्जदारांना आधार लिंक असलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकाचा वापर करुन किंवा ओटीपीद्वारे **https://fancy.parivahan.gov.in/** या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. नवीन मालिका सुरु झाल्यानंतर होणारी लिलावाची कार्यपध्दती पुर्वीप्रमाणेच ऑफलाईन राहणार आहे. वैयक्तिक मालकीच्या वाहनाशिवाय इतर सर्व प्रकारच्या वाहन मालकास आकर्षक नोंदणी क्रमांक कार्यालयामार्फत चालु असलेल्या कार्यपध्दतीनूसार जारी करण्यात येणार आहे.

### सनातन संस्थेचा रौप्यमहोत्सव संपन्न

# हिंदु राष्ट्राचे ध्येय साकार होण्याची वेळ आली ! - प.पू. स्वामी गोविंददेव



**पर्वरी । गोवा । प्रतिनिधी -** काही वर्षांपूर्वी 'हिंदु' हे शब्द उच्चारणे कठीण होते. 'सनातन' उच्चारणे त्याहून कठीण होते. अशा विपरीत परिस्थितीत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्यासारखा एक सत्पुरुष, महात्मा निष्ठेने येथे (गोवा येथे) येऊन उभा रहातो आणि आपल्या तपाला आरंभ करतो. हा सनातन धर्माचा शंखनाद, हा केवळ शंखनाद नसून हिंदु राष्ट्राची स्थापना करण्यासाठीचा शंखनाद आहे. सनातन संस्थेचे वाढणारे कार्य पहाता, 'हे कार्य आता थांबणार नाही, ते उत्तरोत्तर वाढतच जाईल आणि एक दिवस हिंदु राष्ट्र स्थापनेचे ध्येय साकार करेल, याची ग्वाही मिळते. सनातनचे २५ वर्षांचे कार्य पहाता हिंदु राष्ट्र साकार होण्याची वेळ आली आहे, असे गौरवोद्गार 'श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासा'चे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी काढले. ते रामराज्याचे ध्येय उराशी बाळगणार्या 'सनातन संस्थे'चा रौप्य महोत्सव सोहळ्याप्रसंगी बोलत होते. या प्रसंगी १३५० लोकांची उपस्थिती होती. सुकुर पंचायत सभागृह, पर्वरी गोवा येथे भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याच्या प्रसंगी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, गोव्याचे पर्यटनमंत्री श्री. रोहन खंवटे, महाराष्ट्र गो सेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा, गोव्यातील आमदार श्री. चंद्रकांत शेट्ये, आमदार श्री. प्रेमेंद्र शेट, आमदार श्री. उल्हास तुयेकर, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यांसह या सोहळ्याला सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ, सनातनच्या संत पू. दिपाली मतकर, तसेच 'सनातन प्रभात' नियतकालिक समुहाचे माजी समूह संपादक पू. पृथ्वीराज हजारे यांची वंदनीय उपस्थिती लाभली.

प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज पुढे म्हणाले की, कितीही उदात्त विचार असले, तरी शक्ती नसेल, तर ते व्यर्थ आहेत. शक्ती नसेल, तर र्हास होतो. सनातन संस्थेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे सनातनने २५ वर्षांत केवळ धर्माचा प्रसार केला नाही, तर प्रतिकार करणारा समाज निर्माण केला. त्याचे बाळकढू समाजाला पाजले. समर्थ रामदासस्वामी यांनी हेच कार्य केले आहे. एकेकाळी 'सनातन' हा शब्दही कुणी उच्चारत नव्हते. आता मात्र अगदी राजधानी देहलीत 'सनातन बोर्ड' स्थापन करण्याची मागणी होत आहे. हा 'सनातन' शब्द गोव्याहून (म्हणजे 'सनातन संस्था' या नावामुळे) देहलीत गेला आहे. ही 'सनातन' या शब्दाची ताकद आहे. २५ वर्षांत सनातन संस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली, अनेक संकटे आली. आज सनातनच्या तपाचा (म्हणजे व्यापक धर्मकार्याचा) परिणाम आपल्याला पहायला मिळत आहे. सनातन संस्थेविषयी जेवढे गोडवे गावे, तेवढे थोडेच आहे.

**गोवा सरकार देव, देश आणि धर्म रक्षणाचे कार्यासाठी कटीबद्ध ! - मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत**

देवाला महत्त्व दिले, तर धर्म जागृत राहिल आणि धर्म जागृत राहिला तर देश जागृत राहिल. यासाठी गोवा सरकार देव, देश आणि धर्म रक्षणाचे कार्यासाठी कटीबद्ध आहे. सनातन संस्थेने कठीण प्रसांगांना सामोरे जाऊन आज देशभरात भरीव असे कार्य केले आहे. सनातन संस्थेचा गोव्यातील रामनाथी येथील आश्रमातून हिंदु धर्माचे रक्षणाचे महत्त्वाचे कार्य चालते. सनातन संस्थेचा 'सनातन प्रभात' हे नियतकालिक हिंदूंवर देश आणि विदेशात होत असलेल्या अत्याचार, तसेच हिंदू करत असलेले चांगले कार्य याची निरंतर माहिती देऊन हिंदुत्वाच्या जागृतीचे कार्य करत आहे. प.पू. गोविंददेव गिरी महाराज यांच्या सारख्या अनेक राष्ट्रसंतांमुळे भारतात देव, देश आणि धर्म रक्षणाचे कार्य चालत आहे, असे प्रतिपादन गोवा राज्याचे मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत यांनी केले.

**सनातन संस्थेच्या कार्यामुळे हजारो लोक तणावमुक्त आणि व्यसनमुक्त बनले ! - श्री. श्रीपाद नाईक, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री**

प.पू. गोविंददेव गिरि महाराज यांचे कार्य महर्षि वशिष्टाप्रमाणे अखंड असे धर्मरक्षणाचे कार्य केले आहे. महाराजांची साधना आणि कार्य यांमुळे असंख्य जिवांच्या जीवनात चांगले पालट होऊन आज राष्ट्रभक्त निर्माण होत आहेत. सनातन संस्थेने हिंदु धर्माचे पुनर्स्थानेचे विलक्षण असे कार्य केले आहे. या कार्यामुळे हजारो लोक तणावमुक्त आणि व्यसनमुक्त जीवन जगू लागले आहेत. सनातनच्या कार्यामुळे धर्म आणि अध्यात्म यांचे रक्षण झालेले आहे, असे उद्गार केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांनी काढले.

गोव्याचे पर्यटनमंत्री श्री. रोहन खंवटे म्हणाले की, सनातन संस्था ही सनातन धर्माचे रक्षण आणि मानवी मूल्याचे रक्षण करण्याचे महान आणि पवित्र असे कार्य करत आहे. राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांनी धर्मरक्षणाच्या कार्यालाही हातभार लावला पाहिजे. गोव्याची ओळख पूर्ण 'सन, सँड आणि सी' (समुद्रकिनारे) अशी होती. पर्यटन खात्याने गोव्याची ही ओळख बदलण्याचा प्रयत्न गोवा सरकारने सुरू केला आहे. गोवा सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या गोव्यातील कार्याची माहिती पुढील पिढीपर्यंत पोचवण्यासाठी श्री सप्तकोटेश्वर मंदिराची पुर्नबांधणी केली.

या वेळी सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ता श्री. चेतन राजहंस म्हणाले की, सनातन संस्था हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी गेल्या २५ वर्षांच्या काळात जिहादी, कम्युनिष्ट, अर्बन नक्षलवादी आदींचा प्रखर विरोध सहन करून अग्निदिव्यातून तावून सुलाखून बाहेर पडलो. आज 'प्रखर हिंदुत्वनिष्ठ संघटना' म्हणून सनातन संस्था कार्य करत आहे. केंद्रीय गृह मंत्रालय सिद्ध केलेल्या 'सी.ए.ए.' कायद्याच्या प्रक्रियेत सनातन संस्थेचा सहभाग होता. वक्फ संशोधन विधेयक तयार करण्याच्या प्रक्रियेतही सनातन संस्थेने केलेल्या सूचना स्वीकारल्या गेल्या आहेत.

महाराष्ट्र गो सेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा यांनी महाराष्ट्राप्रमाणे गोवा राज्यानेही गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्याची मागणी या वेळी केली. सर्व राज्यांनी जर गोमातेला राज्य मातेचा दर्जा दिल्यास गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळाल्याशिवाय रहाणार नाही, असेही त्यांनी म्हटले.

या सोहळ्याचा आरंभ दीपप्रज्वलन, तसेच वेदमंत्रपठणाने सोहळ्याला प्रारंभ झाला. प्रारंभी प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे ७५ दिव्यांनी औक्षण करण्यात आले आणि यानंतर गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, पर्यटनमंत्री श्री. रोहन खंवटे आणि सनातन संस्थेचे विश्वस्त श्री. वीरेंद्र मराठे यांच्या हस्ते प.पू. स्वामींचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी तपोभूमी कुंडई येथील पीठाधिश्वर ब्रह्मेशानंद स्वामी महाराज यांचा आशीर्वचनपर व्हिडिओ संदेश प्रसारित करण्यात आला.

**सनातन संस्था निर्मित 'ई-बूक'चे प्रकाशन !**

या वेळी प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज आणि केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्या हस्ते 'सनातन प्रभात'च्या रौप्यमहोत्सवी अंकाचे प्रकाशन, सनातन संस्था निर्मित 'कुंभपर्व माहात्म्य' या मराठी भाषेतील 'ई-बुक', 'कुंभपर्व माहात्म्य' या हिंदी भाषेतील 'ई-बुक', तर 'नामजप कोणता करावा?' या मराठी भाषेतील 'ई-बूक'चे प्रकाशन, आणि 'सनातन आश्रम दर्शन' या व्हिडिओचे लोकार्पण करण्यात आले.

# ग्रामीण भागात इएमआयवर वस्तू खरेदीचं प्रमाण जास्त, कर्जबाजारी होण्याचे प्रमाणही अधिक

एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. देशातील जनतेच्या डोक्यावरील कर्जाचा भार दिवसेंदिवस वाढत असल्याचं समोर आलं आहे. एका अहवालात दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीणसह शहरी भागातील जनता कर्जाच्या विळख्यात अडकली आहे. यामध्ये ग्रामीण भागातील प्रमाण शहरी भागापेक्षा जास्त आहे. अहवालात दिलेल्या माहितीनुसार, १ लाख लोकांमागे १८ हजाराहून अधिक लोक कर्जबाजारी आहेत.

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेनं एक अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये कर्जाच्या संदर्भातील माहिती दिली आहे. या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, लोकांचे कर्ज घेण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलं आहे. शहरी भागांतील लोक इएमआयवर वस्तू खरेदी करतात, असे मानले जाते. मात्र, ग्रामीण भागातील लोक देखील मोठ्या प्रमाणात इएमआयवर वस्तू खरेदी करताना दिसत आहेत. ग्रामीण भागात कर्जबाजारीपणाचं प्रमाण जास्त असल्याची माहिती अहवालात सांगण्यात आली आहे.

अहवालात दिलेल्या माहितीनुसार, १ लाख लोकांमागे १८ हजार ३२२ जण कर्जबाजारी झाले आहेत, अशी माहिती केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाच्या व्यापक वार्षिक मॉड्यूलर सर्वेक्षणात देण्यात आली आहे.

या अहवालात देण्यात आलेल्या माहितीनुसार इएमआयवर वस्तू खरेदी करण्यामध्ये शहरी भागातील प्रमाण १७.४४ टक्के आहे. तर ग्रामीण भागातील प्रमाण हे १८.७ टक्के आहे. ग्रामीण भागात कर्ज घेणाऱ्याचं प्रमाण हे ६ टक्क्यांनी वाढलं आहे, तर शहरी भागात हेच प्रमाण २.८ टक्के एवढं आहे. यावरुन ग्रामीण भागात इएमआयवर वस्तू खरेदीचं प्रमाण जास्त असल्याचे दिसून येत आहे.

**ग्रामीण भागातील कुटुंबाचा मासिक खर्च, महिलांवरही कर्जाचं प्रमाण वाढलं**

अहवालात दिलेल्या माहितीनुसार शहरीसह ग्रामीण भागातील कुटुंबाचा मासिक खर्च देखील मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या वाढत्या खर्चामुळं देखील कर्जबाजारीपणाचं प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. गेल्या १० वर्षामध्ये ग्रामीण भागात कुटुंबाचा खर्च १६४ टक्क्यांनी वाढला आहे, तर शहरी भागात कुटुंबाचा खर्च हा १४६ टक्क्यांनी वाढल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. ग्रामीण भागात शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कर्ज आहे. याचं कारण म्हणजे वाढता उत्पादन खर्च आणि घटते उत्पादन हे आहे. शेतकऱ्यांच्या शेतमाला योग्य बाजारभाव नसणे हे देखील कर्जबाजारी होण्याचं कारण आहे. दरम्यान, अहवालात दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीण भागातील महिलांचे कर्ज गेण्याचे प्रमाण अधिक आहे. त्या तुलनेत शहरी भागातील महिलांचे कर्ज घेण्याचं प्रमाण कमी आहे. १ लाख महिलांमागे ग्रामीण भागत १३ टक्के महिला कर्ज घेतात, तर शहरामध्ये १ लाख महिलांमागे १० टक्केच महिला कर्ज घेतात. या आकडेवारीवरुन ग्रामीण भागात महिलाचं कर्ज घेण्याचं प्रमाण वाढत असल्याचं चित्र दिसत आहे.

पान १ वरुन

## शरद पवार ...

मिळत आहे. तसेच, आमदार उत्तम जानकर यांना देखील प्रतोदपदी कार्यभार देण्यात आला आहे. विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांबाबत आज निर्णय झाला नाही, आज ९ सदस्य उपस्थित होते, आजच्या बैठकीला बीडचे आमदार संदीप क्षीरसागर उपस्थित नव्हते. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने १० जागा जिंकल्या आहेत. त्यात, तासगाव मतदारसंघातून रोहित पाटील तर माळशिरस मतदारसंघातून उत्तम जानकर विधानसभेत पोहोचले आहेत.

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालात महाविकास आघाडीला अपेक्षित यश आलं नसून केवळ ४९ जागांवर त्यांना विजय मिळाला आहे. त्यामध्ये, २० जागा जिंकून शिवसेना ठाकरे गट हा सर्वात मोठा पक्ष ठरला, तर काँग्रेसने १७ जागा जिंकल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाला केवळ १० जागांवर यश मिळालं. त्यामुळे, महायुतीमधील एकाही पक्षाकडे विरोधी पक्षनेतेपद मिळेल, एवढे संख्याबळ नाही. मात्र, महाविकास आघाडीमधील पक्षांकडून विधिमंडळ गटनेते आणि प्रतोपदी पक्षातील नवनिर्वाचित आमदारांची नियुक्ती केली जात आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटाने मुंबईत बैठक घेऊन गटनेता व प्रतोद यांची निवड केली होती. आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीनेही गटनेता, मुख्य प्रतोद आणि प्रतोद यांची नियुक्ती जाहीर केली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. त्यानुसार, कळवा-मुंब्रा विधानसभेतून आमदार बनलेले राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते जितेंद्र आव्हाड हे राष्ट्रवादीचे गटनेते बनले आहेत. तर, मुख्य प्रतोदपदी दिवंगत नेते आर.आर. पाटील यांचे चिरंजीव आमदार रोहित पाटील यांना संधी देण्यात आली आहे. तसेच, माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांना प्रतोदपदी नियुक्ती देण्यात आली आहे. दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाच्या आमदारांची पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत बैठक पार पडली होती. या बैठकीत भास्कर जाधव यांची विधानसभेतील पक्षाचे गटनेते म्हणून निवड करण्यात आली. तर, सुनील प्रभू यांना पुन्हा एकदा पक्षाचे प्रतोद बनविण्यात आले आहे. तर, आदित्य ठाकरे यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

## शरीर व मन...

असलेल्या देशात सरकार खेळाकडे सोयीस्कर दुर्लक्ष करते. आज चीन, अमेरिका, जपान या देशांनी खेळाकडे अधिक लक्ष दिल्यानेच ऑलिंपिक मध्ये बहुतांश पदके त्यांनी पटकावली आहेत. खेळ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे हे जाणून जालना शहरात प्रमोद खरात यांनी क्रीडा चळवळीला वाहून घेतले. क्रीडा प्रबोधिनीच्या माध्यमातून त्यांनी एक आदर्श उदाहरण उभे केले. जिल्हा परिषदेच्या शिक्षकाकडून एक हजार प्रमाणे आर्थिक मदत घेऊन जमा झालेल्या पैशातून येथील क्रीडा प्रबोधिनीसह ग्रामीण भागातील मुलामुलींना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून दिली. समाजाला याचा किती उपयोग होऊ शकतो हे त्यांनी दाखवून दिले. अशी चांगली उदाहरणं समाजापुढे ठेवण्याची गरज असल्याचे सांगुन प्रत्येकाने खेळासाठी मदानाकडे वळावे असे आवाहन जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले. यावेळी असोसिएशनचे सचिव हनुमान लुंगे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, सातत्याने खेळत राहा व मोठ्या प्रमाणात सराव केल्याने आपण स्पर्धेत यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही, असे सांगितले. सदरील स्पर्धेसाठी राज्यातून मुलांचे २६ तर मुलांचे १९ असे ४५ संघातील खेळाडू व मार्गदर्शक व्यवस्थापकांसह ६८० जण सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी कोषाध्यक्ष एकनाथ सुरुसे, यशवंत जगदाळे, राजेश शेवाळे, रवि ढगे, सोपान शिंदे, विकास काळे, अमोल चव्हाण, संतोष मोरे, नंदु गायके, सोमनाथ दगडघाटे आदींनी परिश्रम घेतले.

## शास्त्री विद्यालयाच्या ...

पालक मंडळींमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. शुक्रवारी सकाळी बस गावात पोहोचताच शेवगा,वलखेड,बामणी गावकऱ्यांच्या वतीने आगारप्रमुख माधुरी देशमुख, वाहतूक नियंत्रक श्रीमती साळवे, मुख्याध्यापक एल. के. बिरादार, चालक वाव्हूळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी टी. जी. घुगे, एम. के. वखरे, व्ही. एल. तनपुरे, ए. एस. धुमाळ, बी. बी. ढोबळे यांची उपस्थिती होती.

## सिल्लोड शिक्षण ...

आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले आहे. ३ सप्टेंबर १९८२ रोजी त्यांनी सिल्लोड शिक्षण संस्था या नावाने शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. गेल्या ४२ वर्षापासून सिल्लोड शिक्षण संस्थेचे शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये असे त्यांना वाटते म्हणून शहरी, ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागात प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन पदवी व पदव्युत्तर तसेच पीएच.डी. संशोधन केंद्र सुरू करून या द्वारे त्यांनी शहरी व ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच सामाजिक जाणीव ठेवून पूरग्रस्त व भूकंपग्रस्त भागाला भेटी देऊन भरीव मदत केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करून समाजातील चांगल्या व्यक्तींच्या सहकार्यामुळेच आपण इथपर्यंत पोहोचलो व आपणास हा पुरस्कार मिळाला असे ते म्हणाले.

## हिंदू धर्म ...

लोक संसारापासून दूर आहेत त्यांना संसार फलकट आहे हे माहीत नाही परंतु काही लोक संसारात जवळ आहेत परंतु त्यांना संसार हा पलकट आहे हे माहित आहे., कोणतीही कामे करा चांगले करा किंवा वाईट करा परंतु देवाला धरून करा, देवाला धरून केलेली कामे ती सफल होतात असे बोलताना साठे महाराजांनी बोलतांना सांगितले यावेळी धर्मपिठावर खासदार कल्याण काळे, आमदार नारायण कुचे ,जयप्रकाश चव्हाण, हभप प्रभाकर महाराज शास्त्री, हभप उद्धव महाराज घनघाव, अरुण महाराज शिरसाठ, बद्रीनाथ महाराज शेळके ,विठ्ठल महाराज काळे यांची उपस्थिती होती तर पखवाज साथ संगत महाराष्ट्रातील उत्कृष्ट पखवाज वादक हभप भरत महाराज पठाडे हभप, बळीराम महाराज गवारे, गायनाची साथ संगत सर्वश्री हभप नागेश महाराज नानकिल्ले तुळशीराम महाराज दाभाडे, रवींद्र महाराज मदने दादासाहेब महाराज पाटील, विलास बापू देशमुख, गजानन महाराज मुळक दत्तात्रय महाराज शेळके यांनी केली

# तीन पेक्षा कमी मुले झालीत तर समाजाचे अस्तित्त्व टिकणार नाही - मोहन भागवत

**नागपूर -** लोकसंख्या नीतीमध्ये लोकसंख्या वृद्धीदर २.१ पेक्षा कमी होऊ नये असे सांगण्यात आले आहे. शास्त्रही हेच सांगते. त्यामुळे दोन किंवा तीन मुलांपेक्षा कमी मुले झाली तर समाजाचे अस्तित्व टिकणार नाही, असे मत व्यक्त करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी घटत्या लोकसंख्येवर चिंता व्यक्त केली व किमान दोन ते तीन अपत्ये असावे, असा सल्ला दिला.

दक्षिण अंबाझरी मार्गावरील बी.आर.ए. मुंडले शाळेच्या सभागृहात रविवारी कठाळे कुलसंमेलन आयोजित करण्यात आले. कठाळे परिवाराच्या सामाजिक कार्याला २५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन भागवत यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

'दोन किंवा तीन अपत्यांची संख्या समाज टिकण्यासाठी महत्त्वाची आहे. समाजाचे अस्तित्व राहिले पाहिजे अशी सर्वांची भूमिका असते, कारण ते आपले असते. ते किती चांगले किंवा वाईट याचे मूल्यांकन नंतर असते, पण आपले असल्याने ते टिकावे अशी सर्वांची इच्छा असते. यासाठी सर्वांनी दोन किंवा तीनपेक्षा कमी अपत्ये करू नये', असे मोहन भागवत यांनी सांगितले.

'अलीकडे जगभर अहंकार, कट्टरता यामुळे भांडणे होत आहेत. अशा परिस्थितीत आपल्या संस्कृतीचा प्रसार जगभर करणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृती जाती, भाषा किंवा क्षेत्रापुरती मर्यादित नाही. आपल्याकडे मूल्यांना प्रथम स्थान दिले गेले आहे. आपल्याकडे व्यक्ती समाजातील प्रमुख घटक नसून कुटुंब आहे. कुटुंब चालवण्यासाठी कुलनीती चालवणे आवश्यक आहे, कारण यातूनच संस्कृती टिकणार आहे', असेही भागवत म्हणाले. कार्यक्रमात संजय कठाळे आणि उदय कठाळे यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. आभार मधुश्री कठाळे यांनी मानले.

जातीपातीला शास्त्रात स्थान नाही. मात्र, कुटुंबात तशाप्रकारचे आचरण असल्यामुळे अद्यापही समाजात जातीभेद दिसून येतो. मुळात हिंदू धर्म हे नाव नंतर आहे. सर्व मानवजातीच्या कल्याणाचा हेतू असलेला आपला मानव धर्म फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे, असे मत भागवत यांनी व्यक्त केले.

## झुंबर मधून प्रेरणादायी व्यक्तिमत्वांच्या अनेक पैलूंचा उलगडा करण्याचा प्रयत्न - डॉ.कैलास अंभुरे



**परतूर । प्रतिनिधी -** व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्ती प्रमाणे वेगवेगळ्या स्वभावाची, विचारसरणीची अनेक माणसे आपल्या आजूबाजूला वावरत असतात, या पैकी काहीजण आपल्या वैशिष्ट्यपूर्ण स्वभावामुळे वेगळेपण निर्माण करतात. अशा व्यक्तीमत्वातून इतरांना प्रेरणा मिळत असते. प्रा. भांवडलकरांनी आपल्या लिखाणातून अशा काही व्यक्तिमत्वातील चांगल्या गुणांना आपल्या खास शैलीत शब्दबध्द करण्याचे काम केले आहे. त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे विविध पैलू उलगडविण्याचा प्रयत्न केला असल्याचे मत डॉ. कैलास अंभूरे यांनी व्यक्त केले. प्रा. छबुराव भांडवलकर लिखित झुंबर या व्यक्तिचित्रण ग्रंथाच्या प्रकाशन सोहळयात झुंबर वार भाष्य करतांना ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ भारत खंदारे तर डॉ. राम रवणेकर, प्रा.बसवराज कोरे, प्रा.रावसाहेब ढवळे,प्रा.यशवंत सोनुने, प्रा.कावेरी खुरणे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना अंभुरे म्हणाले, व्यक्तिचित्रण हा सोपा प्रकार नाही, त्यासाठी लिहिणाऱ्या मध्ये सहभाव असावा लागतो. आत्मकेंद्री माणसांमध्ये सहभाव सहसा आढळून येत नाही. व्यक्तिचित्रण प्रामुख्याने परकेंद्री या प्रकारात मोडते. व्यक्तिचित्रण पुढच्या पिढीला दिशा देण्याचे काम करत असते, पुढच्या पिढीसाठी तरी आपण लिहिते झाले पाहिजे.

डॉ. राम रवनेकर यांनी आपल्या सविस्तर विवेचानातून झुंबर मध्ये उल्लेखित प्रत्येक व्यक्तीचरित्राचा, त्यांच्यातील गुणांचा अध्यात्मिक दृष्टीकोनातून चिकित्सक पद्धतीने मांडलेला अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला. डॉ.रवनेकर यांच्याहस्ते इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झुंबरचे प्रकाशन करण्यात आले.

प्रा.भांडवलकर यांनी निवृत्तीनंतरच्या काळात लिखाणात घेतलेली आघाडी इतरांसाठी निश्चित प्रेरणादायी आहे. निवृत्तीनंतरचा वेळ कसा घालवायचा या चिंतेत असणाऱ्यासाठी प्रा.भांडवलकर एक आदर्श ठरू शकतात असे मत आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ भानुदास कदम यांनी तर सूत्रसंचालन डॉ.शरद बोराडे यांनी केले. आभार प्रदर्शन कल्याण बागल यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आविष्कार साहित्य मंडळाचे पदाधिकारी आणि साहित्यप्रेमींनी परिश्रम घेतले.

## माहोरा येथील शाळेत बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील माहोरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून, यासाठी प्रशासनासह अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांनी देखील बालविवाह रोखण्यासाठी समाजात जनजागृती करावी, कारण बालवयात विवाह केल्यामुळे मुले मुली शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनत नाही. त्यामुळे बालविवाह रोखण्यासाठी समाजातील पालक आई-वडील यांनी देखील सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याध्यापक श्रीकृष्ण चेके यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक श्रीकृष्ण चेके, शिक्षक सुधीर लकडे, गणेशराव पवार, दिलीप सपकाळ, ए.डी. पवार आदींनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी-** जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात दि.२ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी काही अडचणी असल्यास बैठकीस उपस्थित रहावे. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीस समितीवर नियुक्त शासकीय सदस्य व अशासकीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहावे. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या ग्राहक हितासंबंधी तक्रारी असल्यास बैठकीच्या दिवशी उपस्थित राहून लेखी स्वरुपात मुद्दा मांडण्यात यावा. असे आवाहन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्य सचिव, तथा जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी केले आहे.

## भोकरदन तालुक्याच्या धावडा भागात रान डुकराच्या मासाचा अवैध व्यवहार



**जालना । प्रतिनिधी -** धावडा तालुका भोकरदन या ठिकाणी काही इसम रान डुकराची शिकार करून त्यांच्या मासाची खरेदी विक्री करत आहेत अशी माहिती दिनांक ३० नोव्हेंबर २४ रोजी पहाटे ४ वाजता मिळाल्या वर भोकरदन येथील वनरक्षक डी व्ही पवार यांनी आपल्या पथकासह बालाजी मार्केट परिसरात त्या इसमंचा पाठलाग करून पकडले असता अंकुश किशन गवळी या व्यक्ती जवळ पिवळ्या रंगाच्या पिशवी मध्ये १० किलो रान डुकराचे मास,तुकडे केलेले भाग व कातडी आढळून आली.त्यामुळे जात मोक्यावर सदरील इसमास अटक करण्यात आली असून सदर इसमा विरूध्द भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ०२,०९,३९,४४,४८,४९(इ)५०,५१ अण्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तदनंतर आरोपी नामे अंकुश किशन गवळी, रा. धावडा ता. भोकरदन जि. जालना याला दि. ०१/१२/२०२४ रोजी मा. न्यायालयात हजर करण्यात आले मा. न्यायालयाने सदर आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. मा. श्रीमती सुवर्णा माने, उप वनसंरक्षक, छत्रपती संभाजीनगर, यांच्या मार्गदर्शनाखाली सु.न. मुंढे, सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) जालना, के. डी. नागरगोजे, वनपरीक्षेत्र अधिकारी जालना प्रा. उत्तर, वाय.एम. डोमळे, वनपरीमंडळ अधिकारी भोकरदन, डि व्ही. पवार, वनरक्षक भोकरदन, बी.व्ही. घुगे, वनरक्षक जालना, कु. पुजा ढमाळ, लेखापाल, कु. सोनु जाधव, वनरक्षक, जयाजी शिनगारे, अधि. वनमजुर, घनशाम गव्हाणे, मोमिन तडवी, व इतर कर्मचारी यांचा सहभाग होता.

# जिल्हा स्तरीय स्पर्धात टेंभुर्णीच्या ईबीके उर्दू विद्यालयाचे ९ विद्यार्थी चमकले

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** १०० शिक्षक क्लब जालना द्वारे नवरात्रोत्सव निमित्त जिल्हा स्तरावर आयोजित विविध स्पर्धांमध्ये टेंभुर्णी येथील सेठ ई बी के उर्दू विद्यालयाच्या नऊ विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक कामगिरी करीत बक्षीस मिळविले आहे.

जालना येथील १०० शिक्षक क्लब तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी नवरात्रोत्सवात नऊ शैक्षणिक उपक्रम- सामाजिक परिवर्तनासाठी या उपक्रमांतर्गत दि.३ ते १२ ऑक्टोंबर दरम्यान सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध लेखन, गीत गायन स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पर्यावरण संवर्धन व भारतीय संविधानावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सेठ ई बी के विद्यालयातील ७० विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये भाग घेऊन नैपुण्य प्राप्त केले. या स्पर्धेचे नियोजन,सह शिक्षक शेख़ साबेर यांच्या नेतृत्वात करण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सुमैय्या रोशन शेख़ यांनी परिश्रम घेतले. यामध्ये




सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत फारिया अहेमद अली कुरेशी वर्ग ६ वा,शारिया नजमोद्दीन शेख़ वर्ग ५ वा, बुशरा अफसर कुरेशी वर्ग ६ वा, चित्रकला स्पर्धेत शारिया नजमोद्दीन शेख़ वर्ग ५ वा,अक़्सा नासेर बागवान वर्ग ९ वा, सना शाकेर शेख़ वर्ग १० वा,

निबंध स्पर्धेत अक़्सा नासेर बागवान वर्ग ९ वा,अस्मिरा राहीन मसूद शेख़ वर्ग ८ वा, सोफियान नासेर बागबान वर्ग ५ वा, या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

या विद्यार्थ्यांच्या वतीने जे ई एस कॉलेज जालना येथे शिक्षक शेख़ साबेर यांनी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारले.

या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून ४३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलं कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शप्रवीण बाफना... उपप्राचार्य जे ई एस महाविद्यालय जालना, तर प्रमुख अतिथी म्हणून.. अहमद नुर.. जिल्हा प्रतिनिधी लोकमत टाईम्स, ए एस खिल्लारे, केंद्रप्रमुख काजळा, प्रा. डॉक्टर सुजाता देवरे, अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना, डॉ. संजय येवते, ज्येष्ठ अभिव्याख्याता डायट जालना, तसेच शामराव देशमुख उपशिक्षणाधिकारी जालना, नागेश मापारी शिक्षण अधिकारी लातूर यांच्या शुभहस्ते वरील कार्यक्रम पार पडला. या सर्व विद्यार्थ्यांचे, संस्थेचे अध्यक्ष देवराव देशमुख, संस्थेचे उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे, संस्थेचे सचिव नंदलाल काबरा, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रेमसुख काबरा,संचालक प्रा दत्ता देशमुख, ठमाजी भागवत, मुख्याध्यपक सुरुसे, मुख्याध्यापिका शेख मॅडम,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

## महायुतीत वादाची ठिणगी, मिटकरी व गुलाबराव पाटील भिडले

**मुंबई -** राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून आठ दिवस झाले तरी अद्याप महायुतीने सत्तास्थापनेचा दावा केलेला नाही. २८८ पैकी तब्बल २३५ जागा जिंकून महायुतीने न भूतो न भविष्यति अशा प्रकारची कामगिरी केली आहे. मात्र, महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा काही ठरलेला नाही. त्यामुळे महायुतीवर विरोधक टीका करू लागले आहेत. अशातच महायुतीचे नेते देखील एकमेकांवर टीका करताना दिसत आहेत. महायुतीत अजित पवार आमच्या मध्ये (भाजपा व एकनाथ शिंदेंची शिवसेना) नसते तर आमच्या ९० ते १०० जागा निवडून आल्या असत्या, असा दावा शिवसेनेचे (शिंदे) नेते तथा माजी पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं आहे. त्यावर राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीने (अजित पवार) जशास तसं उत्तर दिलं आहे. या पक्षाचे प्रवक्ते व विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी म्हणाले, अजित पवार नसते तर शिंदे गटाच्या ९० ते १०० जागा आल्या असत्या हा गुलाबराव पाटलांचा गोड गैरसमज आहे. त्यांनी महायुतीत मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करू नये.

अजित पवार यांचे निकटवर्तीय व त्यांच्या पक्षाचे प्रवक्ते म्हणाले, महायुती म्हणून आपण सगळे एकत्र निवडणूक लढलेलो आहोत आणि आताही आपण एकत्र राहिलं पाहिजे. शेवटी अजित पवार यांनी घेतलेली मेहनतही दुर्लक्षित करता येणार नाही. तिन्ही पक्षांनी निवडणुकीत खूप मेहनत केली आहे. आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मेहनत नाकारत नाही. देवेंद्र फडणवीस यांनी केलेली मेहनत देखील नाकारत नाही. कारण आम्हाला ठाऊक आहे की या तिन्ही नेत्यांनी, तिन्ही पक्षांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी खूप कष्ट घेतले आहेत. मोठ्या मेहनतीने आपल्याला या निवडणुकीत यश मिळालं आहे. अमोल मिटकरी म्हणाले, शिवसेनेचे (शिंदे) नेते रामदास कदम असतील किंवा गुलाबराव पाटील असतील यांनी अजित पवारांना टार्गेट (लक्ष्य) करू नये. महायुतीत वितुष्ट निर्माण करू नये. गुलाबराव पाटलांनी एक गोष्ट समजून घ्यावी. त्यांचं नाव गुलाबराव आहे. त्यांनी त्याच्या नावासारखं राहावं. हल्ली त्यांचा सुगंध कमी झालेला दिसतोय. कॅबिनेटमध्ये म्हणजेच राज्य मंत्रिमंडळात मंत्रीपदी त्यांची वर्णी लागतेय की नाही याबद्दल जरा शंका आहे. त्यामुळे ते अशी वक्तव्ये करत असावेत. मला गुलाबरावांना एवढंच सांगायचं आहे की तुम्ही गुलाबरावांसारखं राहा, जुलाबराव होऊ नका.

# घरोघरी संविधानाचा जागर व्हावा - रेखाताई सपकाळ

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** शहरातील महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयात , महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त व संविधान सन्मान दिना निमित्त आज दि.२८नोव्हे.२०२४रोजी महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आशा वर्कर प्रमुख - रेखाताई सपकाळ ह्या होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले, व भारतरत्न.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा. रेखाताई सपकाळ यांनी संविधानाचे महत्व विशद करतांना सांगितले की, आशा वर्कर च्या सर्व कर्तबगार महिला भगिनी घरोघरी जाऊन संविधानाचे महत्व जनसामान्यांना पटवून देतील, त्यामुळे संविधान साक्षर नागरिक घडतील, जनजागृती साठी आशा वर्कर प्रयत्नरत राहुन कार्य करतील असे आश्वासन दिले. महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष. रावसाहेब अंभोरे यांनी सांगितले की, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांनी दाखविलेल्या मार्गावरून आपण वाटचाल केली, तर आपल्या जीवनाचा उत्कर्ष झाल्या शिवाय राहाणार नाही.या प्रसंगी टेंभुर्णी शहरातील प्रसिद्ध कवी. शेख साबेर सर यांनी भारतीय संविधान हे सर्व धर्मग्रंथापेक्षा सर्वश्रेष्ठ असुन त्याचे वाचन करून, सन्मान करून,त्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले,तर जेष्ठ समाजसेवक पी.जी.तांबेकर गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमाणे वाचन करून, शाळेत जाऊन, अभ्यास करून, स्वतःच्या जीवनाचे स्वतः शिल्पकार व्हा! असे आवाहन केले.प्रा.डॉ.अरूण आहेर यांनी संविधानाचे महत्व विशद करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना गुरूस्थानी मानुन समता, बंधुता, न्याय,या मौलिक तत्वांवर आधारित भारतीय संविधान आपल्या भारताला दिले, त्यामुळे भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश ठरला असे प्रतिपादन केले. तसेच शालेय विद्यार्थीनी श्रावणी मघाडे, ऋतूजा सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले,कार्यक्रमाला पी.जी.तांबेकर, पो.उ.नि..रविंद्र देशमाने,जि.प.प्रशालेचे शेळके सर, राजेश शेवाळे सर,साबेर शेख सर,अवघडराव देशमुख सर,फकरू कुरेशी सर, बंडु पाबळे, अभिजित अंभोरे,यांची प्रमुख उपस्थिती होती, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन- भिवसन ससाणे यांनी केले. महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या श्रीमती.जे. बी.के. विद्यालय,सेठ इ.बी.के. विद्यालय, भारतमाता विद्यालय,जि.प.प्रा.शाळा, पोलिस ठाणे, आशा वर्कर, यांनाः- ५१ भारतीय संविधान ग्रंथाची भेट दिली. या कार्यक्रमात टेंभुर्णी शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी, आशा वर्कर, शिक्षक, प्रतिष्ठित नागरिक ,मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व मान्यवरांनी या प्रसंगी भारतीय संविधान सन्मान व संवर्धनासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही दिली. व कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.




## नृसिंह सेवाभावी संस्थेच्या वतीने अन्नदान वाटप



**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील श्री नृसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जालनातर्फे दर गुरुवार आणि शनिवारी अन्नदान करण्यात येत आहे. याही शनिवार व गुरुवारी गोर-गरीबांना संस्थेच्या वतीने अन्नदान करण्यात आले. यापुढेही अन्नदान करण्याची इच्छा असेल अशांनी (९९६०२६१३५१ /८६००६२१५१७) अमोल टाकळकर यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुहास वैद्य, अमोल टाकळकर, रवी शिरसाठ, अभिजीत कुलकर्णी, भूषण कुलकर्णी, गणेश मावळे, सुनील काळे, दिनेश घुले, रंजीत घाडगे, श्रीपाद सातोनकर आदींनी परिश्रम घेतले.

राहत सोशल ग्रुप जालना आयोजित मुस्लीम सामुहिक विवाह सोहळ्यात २१ जोडप्यांचा विवाह

# राहत सोशल ग्रुप सर्वतोपरी सहकार्य केले जाईल - खासदार डॉ. काळे

**जालना । प्रतिनिधी -** राहत सोशल ग्रुप जालना आयोजित २३ व्या मुस्लिम विवाह सोहळ्यात आज सकाळी १० वाजता आयेशा लान्स, उर्दू हायस्कूलचया पाठी मागे, जुना जालना येथे २१ मुस्लीम जोडप्यांचा विवाह पार पडला आणि विवाह प्रवचन काजी सय्यद अब्दुल वाहिद यांनी केले . यावेळेस एकबाल पाशा, मोहम्मद नसीम चौधरी, विनायक महाराज फुलंब्रीकर , अयुब खान अक्सा हॉटेल, हाजी शेख अब्दुल वाहिद, फैसल बिन सालेम बिन समियादा चाऊस, साई नाथ पवार जिल्हाध्यक्ष फार्मास्युटिकल असोसिएशन, बशारत अली खान अख्तर, रियाज भाई, गणेश सुपारकर, माजिद भाई उर्फ सलमान भाई, मोहन ईंगळे, डॉ.मुशीर इनामदार, गोपाळ मोरे, अनस चाऊस, हाजी युसूफ खान, प्रसाद कुलकर्णी, अतिक अहमद खान, अब्दुल करीम बिल्डर, काझी सय्यद अब्दुल वाहिद, हाफिज सय्यद इसरार, आदी उपस्थित होते. हाफिज सय्यद इसरार यांनी पवित्र कुराणाचे पठण करून आणि नातिया यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली, ,यावेळेसअध्यक्षिय भाषणातमाजीआमदार कैलास गोरंट्याल यांनी म्हटले की राहत सोशल ग्रुप जालानाचा उपक्रम प्रशंसनीय आहे कोणत्याही व्यत्ययाशिवाय यशस्वी मुस्लिम सामूहिक विवाह पार पाडणे आणि आता मुस्लिम सामूहिक विवाहाच्या माध्यमातून सहाशेहून अधिक विवाहित जोडप्यांचे विवाह झाले आहेत आणि आम्ही राहत सोशल ग्रुप जलानाच्या नेहमीच पाठीशी आहोत . यावेळी खासदार डॉ.कल्याण काळे यांनी राहत सोशल ग्रुप जालना आयोजित मुस्लीम समुह विवाहाचे कौतुक केले व ते म्हणाले की, राहत सोशल ग्रुप जालना तर्फे मुस्लिम सामुहिक विवाहाचे यशस्वी आयोजन हे केवळ सामाजिक कार्यच नाही तर देश व राष्ट्रासाठी हिताचे आहे. देशाचे एक महत्त्वाचे कर्तव्य पार पाडायचे असून राहत सोशल ग्रुप जालना हे कर्तव्य चोखपणे पार पाडत आहे आणि आम्ही रहात सोशल ग्रुप जालना ला सर्वतोपरी साथ देऊ.यावेळेस एकबाल पाशा, विनायक महाराज फुलंब्रीकर, गणेश सुपारकर यांनीही आपले सुवर्णविचार व्यक्त करून राहत सोशल ग्रुप जालना च्या कामगिरीचे कौतुक केले तसेच जालना जिल्ह्यातील शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जोहरा रब्बानी सरफराज खान, आरती रामेश्वर चौंडीए,, सिद्दीकी ओबेद अब्दुल रहेमान हुदा उर्दू हायस्कूल, नरिमन नगर जालना,इम्रान इनायत खान, अब्दुल्ला चाऊस, जावेद खान सलीम खान, शिक्षिका आयेशा बानो सिकंदर अली, चंदन कबुल मल गेही, शाह नवाज खान, डॉ शेख जावेद, डॉ शेख अब्दुल मतीन, पोलीस कॉन्स्टेबल दिगंबर पैजने, फिरोज बागबान, आणि बुशरा हुसेन बरकतोद्दीन यांना राहत गौरव सन्मन सन्मानित करण्यातआला . कार्यक्रमयशस्वी करण्यात राहत सोशल ग्रुप जालना चे अध्यक्ष शेख अफसर शेख जी, सचिव लियाकत अली खान यासिर जालनावी, शेख सलीम शेख मुहम्मद , शेख सलीम शेख शकूर, सय्यद अख्तर, शेर जमान खान, सईद जहागीरदार, सय्यद एजाज, जफर खान, मेहबूब शेख, शेख कमर, शेख सोनो, खिजर फारूख, अम्मार यासीर, ओसाम शेख, अहमद जहागीरदार, शेख फहीम, शेख मेहबूब, सय्यद शाकीर, शेख सलीम शेख शाकूर, सईद जहागीरदार. , महंमद हाशिम, हुसेन खान, शेख जमीर आदींनी प्रयत्न केले.

डॉ.सलीम नवाज हशर जाफराबादी आणि सचिव राहत सोशल ग्रुप जालना लियाकत अली खान यासीर यांनी कार्यक्रमाच्या सुत्र संचालन केले आणिआभार राहतसोशलग्रुपचे अध्यक्षशेखअफसर शेखजी यांनी केले.



## निवडणुक निकालाबाबत जनतेत संभ्रम आहे - खा. डॉ. काळे



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून राज्यभरात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी असून कायदेशीर बाबी तपासण्यासाठी तत्परतेने जे कामे व्हायला पाहिजे ते होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यभरामध्ये जनतेमध्ये संतापाची लाट असून निवडणूक आयोगाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात उठाव करण्याची जनतेमध्ये मनस्थिती असून याबाबतीत मतदानामध्ये पडलेले मत आणि मतमोजणी मधील मतपेटीतील मत यामध्ये मोठी तफावत असून त्यासाठी राज्यभरात मोठे जन आंदोलन च्या स्थितीमध्ये जनता असून आम्ही सुद्धा यामध्ये सक्रिय सहभाग घेऊ असे खासदार डॉक्टर कल्याण काळे यांनी म्हटले आहे.

रविवार (दि १) रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास खासदार डॉ.कल्याण काळे यांनी राहत एज्युकेशनल अन्ड सोशल ग्रूप च्या सामूहिक लग्न समारंभामध्ये हजेरी लावली होती. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.